## NCP चा वाद निवडणूक आयोगात! अजित पवारांचा पक्ष-चिन्हावर दावा; आमचंही ऐकून घ्या - शरद पवार

**वृत्तसंस्था / ०५ जुलै**

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षातील नाराज आमदारांनी बंडखोरी केल्यानंतर मागील काही दिवसांपासून राज्यात अजित पवार गट विरुद्ध शरद पवार गट असा संघर्ष पहायला मिळत आहे. एकीकडे हा संघर्ष अगदी रस्त्यावर उतरुन सुरु असतानाच दुसरीकडे दोन्ही गटांनी थेट निवडणूक आयोगाकडेही पक्षासंदर्भात अर्ज केले असल्याने हा संघर्ष शिवसेना संघर्षाच्या वाटेनं जाणार असल्याचं स्पष्ट होत आहे.

अजित पवार गटाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर दावा केला आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने म्हणजेच शरद पवार गटाने निवडणूक आयोगात अर्ज दाखल केल्यानंतर अजित पवार गटाने पक्ष आणि पक्ष चिन्हावर दावा करत थेट निवडणूक आयोगाकडे यासंदर्भातील अर्ज केला आहे. २ दिवसांपूर्वीच शरद पवार गटाने पक्षातील कोणत्याही नेत्याने पक्षावर दावा केल्यास आमची बाजू ऐकून घेतली जावी असा अर्ज केला होता. त्यानंतर आता अजित पवार गटाने थेट पक्षावर दावा केला आहे.

दैनिक
# साहसिक
epaper
www.sahsik.com
सजग समाजाचा दक्ष प्रहरी

**पाहिजेत**
वर्ध्यातून प्रकाशीत होणारे दैनिक साहसिक
या वृत्तपत्रा करिता संगणक चालक
(ऑपरेटर )ची आवश्यकता आहे
पद- २
संपर्क
दैनिक साहसिक कार्यालय
राधे कॉम्प्लेक्स ,
तिसरा मजला सोशलिस्ट चौक,वर्धा

वर्धा, नागपूर, अमरावती, अकोला, बुलडाणा,गडचिरोली, धुळे, जळगाव, औरंगाबाद, नाशिक, पुणे, रत्नागिरी, मुंबई व दिल्ली येथुन एकाचवेळी वितरित ...!

वर्ष : १७ | अंक :१४ गुरुवार ०६ जुलै २०२३ | मुख्य संपादक : रविंद्र एन. कोटंबकार | (पृष्ठ -८) | मूल्य : ३ रुपये

### सुविचार

सौंदर्य हे वस्तूत नसते;
पाहणाऱ्याच्या दृष्टीत
असते.

### चारोळी

हातात हात घेशील जेव्हा
भिती तुला कशाचीच
नसेल
अंधारातला काजवाही
तेव्हा
सुर्यापेक्षा प्रखर असेल

### हसा जरा जपून..

एक पती: अहो माझी बायको हरवलीय.
दुकानदार: त्याचा इथे काय संबंध.
हे एक मेडिकल स्टोअर आहे
तुम्ही पोलिस स्टेशन ला जा.
पती: ओह माफ करा.
आनंदाच्या भारत कुठे जायचं हे सुद्धा समजेना.

## पुन्हा पेटवा मशाली:चिन्ह जाणार नाही, जाऊ देणार नाही; काहींच्या सभेत माझा फोटो, त्यांना माहित आहे, त्यांचे नाणे चालणार नाही - शरद पवार



**वृत्तसंस्था / ०५ जुलै**

**मुंबई:** ज्या कार्यकत्यांनी निवडून दिले. विधिमंडळात जाण्याची संधी दिली. त्या लोकांना न विचारत तसेच पक्षाला विचारात न घेता, जो विचार आपल्याला मान्य नाही त्यांच्यासोबत जाणे योग्य नाही, हे मला कदापी मान्य नाही, असा घणाघात शरद पवार यांनी केला. मुंबईत ते कार्यकर्त्यांशी संवाद साधला. तर पक्षातून उभी फुट पाडत बाहेर पडलेल्या अजित पवार गटावर देखील त्यांनी जोरदार टीका केली.

**पांडुरंग म्हणायचे अन् टीका करायची**

शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, काही लोकांचा आज मेळावा झाला. त्या मेळाव्याला माझा फोटो होता. गुरू म्हणायचे, पांडुरंग म्हणायचे. आणि माझ्याकडे दुर्लक्ष झाले असे म्हणत आरोप करायचा, याला काही अर्थ नाही. अशी टीका शरद पवार यांनी छगन भुजबळ यांच्यावर केली.

**त्यांचे नाणे खणखणीत नाही**

पुढे बोलताना ते म्हणाले की, काही लोकांनी आत्ताच मेळावा घेतला. त्यात सर्वात मोठा फोटो माझा होता. मी नकार देऊन देखील त्यांनी माझा फोटो वापरला. कारण, त्यांना माहित आहे की, त्यांचे नाणे खणखणीत नाही. माझा फोटो वापरल्याशिवाय त्यांचे नाणे खणखणीत वाजणार नाही.

**राज्यकर्त्यांची फळी उभारली**

२४ वर्षांपूर्वी या मुंबई शहरात तुम्ही सर्वांच्या उपस्थित जन्म झाला. शिवाजी पार्कवर लाखोंची सभा झाली, आज चोवीस वर्षे झाली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात नेतृत्वाची फळी निर्माण करण्यात राष्ट्रवादीला यश आले. त्यामुळे कोणी आमदार, खासदार, मंत्री झाले. अनेक मंत्रीमंडळात काम करायची संधी झाली. सामान्य कुटुंबातील व्यक्ती राज्य कसा चालवू शकतो, हे दाखवून दिले. या माणसाच्या शेवटच्या माणसाच्या जीवनात प्रकाश कसा येईल, यासाठी पक्ष काम करत आहे, असे शरद पवार म्हणाले.

**संकटे अनेक, पण संघर्ष सुरू राहिल**

पक्षाच्या विचाराला तिलांजली देत, विरोधी विचारांच्या लोकांची साथ देणारे आम्हाला मान्य नाही. ती वैचारिक भूमीका देशाच्या हिताची नाही. त्यांच्या हातात देशाची सूत्रे आहेत. त्यामुळे आपला लढा चालूच राहणार आहे. आज संकट खूप आहेत. मात्र, तुमची साथ असल्याच अजिबात डगमगण्याची काळजी नाही, अशी साद शरद पवार यांनी कार्यकर्त्यांना घातली.

(उर्वरित पान २ वर)

## 'दादा'गिरी: राष्ट्रवादीने दोनदा मुख्यमंत्रीपदाची संधी गमावली, वय झाले आता थांबा, आशीर्वाद द्या! अजित पवारांचा शरद पवारांवर हल्ला



**वृत्तसंस्था / ०५ जुलै**

**मुंबई:** राष्ट्रवादी काँग्रेसने आतापर्यंत दोनवेळा मुख्यमंत्रीपदाची आलेली संधी गमावली. अन्यथा यापूर्वीच महाराष्ट्राला राष्ट्रवादीचा मुख्यमंत्री लाभला असता, असे शल्य उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्यावर शरसंधान साधताना व्यक्त केले. शरद पवारांनी वसंत पाटलांना बाजूला सारून मुख्यमंत्रीपद मिळवले. तेव्हापासून नागरिकांनी त्यांची साथ दिली. पण प्रत्येकाचा एक काळ असतो. आता त्यांनी मार्गदर्शकाच्या भूमिकेत जाऊन आराम करावा. आपला हट्टीपणा सोडावा, असेही ते यावेळी म्हणाले.

अजित पवार म्हणाले की, ही वेळ आपल्यावर का आली, शरद पवार हे आपले श्रद्धास्थान आहे. छत्रपती शिवाजी महाराजाचे स्वराज्य आपल्याला तयार करता आले पाहिजे, असे मत अजित पवार यांनी व्यक्त केले. वसंत पाटील यांचे सरकार बाजूला सारले आणि सरकार स्थापन केले. शरद पवारांनी अनेक पक्ष काढले आणि त्यांना लोकांनी राज्याच्या राजकारणात योग्य स्थान दिले. १९८६ ला समाजवादी पक्ष काँग्रेसमध्ये विलिन केले, त्यांनापद मिळाले नाही, पण त्यानंतर मुख्यमंत्रीपद मिळाले. केंद्रात मंत्रिपद मिळाले. १९७८ पासून शरद पवारांनी लोकांनी साथ दिली आहे. प्रत्येकांचा एक काळ असतो असे म्हणत अजित पवारांनी मोठे विधान केले आहे. अजितदादांनी विलिनिकरणांचा इतिहास सांगितला आहे.मी कधीच जातीपातीचे राजकारण केले नाही असे म्हणत शरद पवारांना अप्रत्यक्ष टोला लगावला आहे.

अजित पवार म्हणाले की,सोनिया गांधी परदेशी असल्याचा मुद्दा पुढे करण्यात आला आणि काही दिवसांनी त्यांच्यासोबत काम केले असे सांगताना अजित पवार सांनी शरद पवार यांचा राजकीय प्रवास सांगत खोचक टोला लगावला आहे.२००४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला संधी आली होती तेव्हा मुख्यमंत्रीपद सोडण्यात आले नाहीतर आज राष्ट्रवादी काँग्रेसचा मुख्यमंत्री राज्यात राहिला असता. २०२२ वेळाही संधी आपण सोडली असा टोलाही त्यांनी लगावला.

**मी खोटं बोलणार नाही**

मी महाराष्टाला कधी खोटं बोलणार नाही, खोटे बोलेल तर मी पवारांची औलाद असल्याचे सांगणार नाही म्हणत भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांसोबत राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ नेत्यांनी चर्चा केली. पण मला सांगण्यात आले कुणाला काही सांगायचे नाही असे सांगून मला शांत केले. २०१७ ला शिवसेना जातीयवादी वाटत होती म्हणून भाजपसोबत न जाण्याची भूमिका मोठ्या नेत्यांनी घेतली आणि नंतर शिवसेनेसोबत जात भाजप जातीयवादी कसे वाटले. मी उद्धव ठाकरेंना सांगितले होते की शिवसेनेत नाराजी आहे, पण त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले, असा दावाही त्यांनी केला आहे.

**शरद पवारांनी सल्लागार व्हावे**

अजित पवार म्हणाले की, २०१९ मध्ये भाजपसोबत ५ बैठका झाल्या होत्या. मात्र तेव्हा पुढे बोलण्यासाठी जाऊ दिले नाही. असे म्हणत अजित पवारांनी भाजपसोबत जाण्यासाठी सर्व आमदारांची तयार होती पण

(उर्वरित पान २ वर)

## पवार कुटुंबांत थेट संघर्ष:राष्ट्रवादीचे नाव अन् पक्षचिन्ह द्या! अजित पवारांची EC कडे मागणी



**वृत्तसंस्था / ०५ जुलै**

**मुंबई:** अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील बंडखोरीनंतर वेगवान घडामोडी घडत आहेत. अजित पवारांनी बंडखोरीनंतर लगेचच उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेऊन शिवसेना-भाजप सरकारला पाठिंबा दिला. त्यानंतर लगेचच राष्ट्रवादी काँग्रेसचे नाव व पक्षचिन्हावर दावा सांगितला. त्यानंतर आता त्यांनी थेट निवडणूक आयोगाकडे याचिका दाखल करून या राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव व घड्याळ या पक्षचिन्हाची मागणी केली आहे.

दुसरीकडे, शरद पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीच्या गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी अजित पवारांसह ९ आमदारांना अपात्र घोषित करण्याची मागणी केली आहे.

अजित पवारांनी गत रविवारी राष्ट्रवादी काँग्रेसशी बंडखोरी केली. त्यानंतर त्यांनी आपल्याला जवळपास ४० आमदारांचा पाठिंबा असल्याचा दावा केला आहे. या घटनाक्रमामुळे अवघा महाराष्ट्र ढवळून निघाला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीच्या अजित पवार व शरद पवार या दोन्ही गटांनी बुधवारी मुंबईत जोरदार शक्तीप्रदर्शन केले. अजित पवारांच्या गटाच्या मेळाव्याला राष्ट्रवादीचे ३० हून अधिक आमदार उपस्थित होते. तर शरद पवारांच्या बैठकीला १५ हून अधिक आमदारांची हजेरी होती.

## बापासाठी लेक मैदानात:बापाचा नाद करायचा नाय, पदर खोचून उभी राहीन, सुप्रिया सुळेंचा अजित पवारांना इशारा



**वृत्तसंस्था / ०५ जुलै**

**मुंबई:** माझ्या बापाचा व आईचा नाद करायचा नाही. बाकी कुणाबद्दलही बोला. माझ्याबद्दल बोला. पण माझ्या बापाचा नाद करायचा नाही. मी महिला आहे. कुणी बोललं तर टचकण डोळ्यात पाणी येतं. पण संघर्षाची वेळ आली की, हीच महिला पदर खोचून मैदानात उभी राहते. तीच अहिल्या होते व जिजाऊही होते, असा रोखठोक इशारा राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांनी बुधवारी अजित पवार व त्यांच्या समर्थक आमदारांना दिला. काही जण पक्षातील वडिलधाऱ्यांना सांगतात की, तुमचे वय झाले, आता थांबा, अरे यांच्या पेक्षा आम्ही मुली बऱ्या, असेही त्या यावेळी अजित पवारांना उद्देशून म्हणाल्या.

काही जण पक्षातील ज्येष्ठांना घरी बसण्याचा सल्ला देत आहेत. यामुळे माझे मन अधिक घट्ट झाले आहे. वय केवळ आकडा असतो. आपल्यात जिद्द असली पाहिजे, असेही सुप्रिया यावेळी म्हणाल्या. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचाही समाचार घेतला. भाजप हा देशातील सर्वात भ्रष्टाचारी पक्ष आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला भ्रष्ट पक्ष असल्याचा दावा करणाऱ्यांनीच आज राष्ट्रवादीत फूट पाडून संपूर्ण पक्षच तिकडे

(उर्वरित पान २ वर)

## अजित पवार होणार मुख्यमंत्री, तारीखही ठरली? दिल्लीश्वरांचा पाठिंबा



**वृत्तसंस्था / ०५ जुलै**

**मुंबई:** अजित पवार राज्याचे नवे मुख्यमंत्री होणार असल्याचा ठाम दावा एका इंग्रजी न्यूज पोर्टलने केला आहे. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेच्या १६ आमदारांना अपात्र घोषित ठरतील. त्यानतंर त्यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याचे निर्देश देतील. यामुळे आपसूकच राज्य मंत्रिमंडळ बरखास्त होईल, असे या पोर्टलने सूत्रांचा दाखला देत म्हटले आहे.

**११ ऑगस्टला घेणार मुख्यमंत्रीपदाची शपथ**

अजित पवार संसदेचे पावसाळी अधिवेशन संपल्यानंतर येत्या ११ ऑगस्ट रोजी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाच्या आशीर्वादाने दिल्लीत हा फॉर्म्युला ठरवण्यात आला आहे, असे रेडिफने आपल्या वृत्तात म्हटले आहे. रेडिफच्या या दाव्यामुळे अगोदरच अस्वस्थता पसरलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत मोठी खळबळ माजली आहे. एवढेच नाही तर राज्याच्या राजकारणातही मोठी खळबळ माजली आहे.

**मार्च २०२२ पासून अमित शहांच्या संपर्कात**

एकनाथ शिंदे यांनी २० जून २०२२ रोजी उद्धव ठाकरेंविरुद्ध बंड करून भाजपसोबत सरकार स्थापन केले होते. तत्पूर्वी, अजित पवार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व देवेंद्र फडणवीस यांच्याशी नियमित संपर्कात होते. पण भाजपने अजित पवारांना मुख्यमंत्री करण्याची मागणी फेटाळल्यामुळे शेवटच्या क्षणी ही योजना फसली, असा दावा या न्यूज पोर्टलने आपल्या वृत्तात केला आहे.

अजित पवार मार्च २०२२ पासून अमित शहांच्या नियमित संपर्कात होते. शिंदेंच्या बंडखोरीपूर्वीच अजित पवार यांना मुख्यमंत्री करण्याची मागणी

(उर्वरित पान २ वर)

## ८०० रुपयांसाठी ९ महिन्यांच्या पोटच्या पोरीला विकल




**वृत्तसंस्था / ०५ जुलै**

**ओडिशा:** ओडिशामध्ये एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. येथील एका आदिवासी महिलेने आर्थिक चणचणीला कंटाळून चक्क आपल्या ९ महिन्याच्या बाळाला विकलं आहे. मयूरभंज जिल्ह्यामध्ये हा प्रकार घडला असून केवळ ८०० रुपयांसाठी या महिलेने आपल्या चिमुकलीचा सौदा केला आहे. पोलिसांनी या बाळाची सुटका केली आहे. या प्रकरणामध्ये मुलीची विक्री करणारी आई, तिला विकत घेणारं दांपत्य आणि हा सौदा घडवून आणणाऱ्या मध्यस्थी करणाऱ्या महिलेला अटक करण्यात आली आहे. मुलीच्या आईने दिलेल्या माहितीनुसार, तिला मुलीचं योग्य पद्धतीने पालन पोषण करता येत नव्हतं. त्यामुळेच तिने आपल्या मुलीला शेजारच्या गावातील एका जोडप्याला विकण्याचा निर्णय घेतला.

**पती परत आला अन् त्याला घरी एकच मुलगी दिसली**

या महिलेचं नाव करामी मुर्मू असल्याची माहिती समोर आली आहे. करामीला एकूण २ मुली आहेत. त्यापैकीच धाकट्या मुलीला तिने विकलं. या चिमुकलीचं नाव लीजा असं आहे. करामीच्या पतीचं नावं मुशू मुर्मू असं आहे. धक्कादायक बाब म्हणजे पत्नीने मुलीला विकल्याची कल्पनाही मुशूला नव्हती. मुशू हा कुंटुंबाचं संगोपन करता यावं म्हणून तामिळनाडूमध्ये नोकरी करतो. करामी एकटीच तिच्या मुलींबरोबर गावात राहते. बऱ्याच काळापासून पती ओडिशामधील मूळ गावी आला नव्हता. मात्र अचानक तो पत्नीला न सांगता एक दिवस घरी आला. त्यावेळी त्याला घरी एकच मुलगी असल्याचं दिसलं. त्याने अनेकदा पत्नीला छोट्या मुलीसंदर्भात विचारलं. मात्र तिला योग्य उत्तर देता आलं नाही. अखेर त्याने यासंदर्भात पोलिसांकडे तक्रार केली.

मुलींचा ताबा आजीकडे

पोलिसांनी मुशूच्या तक्रारीच्या आधारे गुन्हा नोंदवून घेत तपास सुरु केला. तपासादरम्यान पोलिसांना मुली बेपत्ता होण्यामागे तिची आईच असल्याची माहिती मिळाली. पुराव्यांच्या आधारे आरोपी आईला ताब्यात घेण्यात आलं. अटकेनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना या महिलेने आपल्याला घरखर्च चालवणं कठीण जात होत म्हणून मुलीला विकल्याचं सांगितलं. तिने सांगितलेलं कारण ऐकून पोलिसही थक्क झाले. ज्या दांपत्याला करामीने मुलगी विकली त्यांना एकही मूलं नसल्याने त्यांनी या मुलीला विकत घेतलं. या प्रकरणामध्ये पोलिसांनी या चिमुकलीला आता बाल विकास समितीच्या देखरेखीखाली तिच्या आजीकडे सोपवलं आहे. थोरल्या मुलीचा ताबाही सध्या आजीकडेच देण्यात आला आहे. तिन्ही आरोपी सध्या तुरुंगात आहेत. मुशू हा पुन्हा कामानिमित्त तामिळनाडूला गेला आहे. पोलीस या प्रकरणामध्ये पुढील तपास करत असून सध्या या तिघांची चौकशी करत आहेत.

## शिष्याने गुरूचा धडा गिरवला तर त्यात गैर काय? बंडखोरीवरून धनंजय मुंडे यांचा शरद पवार यांना खोचक टोला




**वृत्तसंस्था / ०५ जुलै**

**मुंबई:** एखाद्या शिष्याने गुरूचा धडा गिरवला तर त्यात गैर काय, हे तर चांगलेच आहे, असे मत मंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले आहे. तर अजित पवार यांच्यावर अनेकदा आरोप करत त्यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे, अशी टीका केली आहे.

दरम्यान धनंजय मुंडे म्हणाले की, १९९९ ला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली. त्यावेळी छगन भुजबळ यांनी प्रदेशाध्यक्षपदावर काम केले. पहिल्या वर्षातच सत्ता आली त्यावेळी स्वाभिमानासाठी शरद पवार यांनी निर्णय घेतला होता. मात्र, ३ ते ४ बडव्यांमुळे हा सर्वांना निर्णय घ्यावा लागला, असा आरोप करत धनंजय मुंडे यांनी जयंत पाटील यांच्यावर टीका करण्यात आली.

धनंजय मुंडे म्हणाले की, कठीण प्रसंगामध्ये अतिशय वाईट काळात सर्व नेत्यांनी शरद पवार यांची साथ दिली. तटकेर यांनी ४० वरुण ५४ पर्यंत संख्या नेली, कारण अजितदादांनी अनेक वेदना सहन केल्या. मात्र, आमच्या विठ्ठल असेलेल्या शरद पवारांचा शब्द आम्ही तोडला नाही,आणि आज हा निर्णय घ्यावा लागतो तेव्हा किती वेदना सहन कराव्या लागत असतील हे समजून घेणे घेण्यासारखे आहे.

धनंजय मुंडे म्हणाले की,अजितदादांनी अनेकदा त्यांना मिळणारे पद इतर लोकांना दिले आहे.घरातून आणि पक्षातून काढलेल्या माणसाला अजित पवार यांनी मोठे केले आणि ही संधी मला दिली आहे.अजित पवार यांनी त्यांच्या सवालीला देखील आपला अपमान आणि समजू दिला नाही. अजित पवार यांच्यावर अनेकदा अजितदादांना बदनाम करण्यात येत आहे. अजित पवार यांनी सर्व काही सहन करूनही काहीच केले नाही, असे म्हणत आपली खंत व्यक्त केली आहे.आमचे हिंदुत्व छत्रपती शिवाजी महाराज हे आहे. हसन मुश्रीफ यांनी राम मंदिर उभे केले आहे. आम्ही सर्वांना सोबत घेऊन काम करतो.